# मेट्रोच्या वनाझ ते रामवाडी मार्गिकेचे वाघोलीपर्यंत विस्तारीकरण करावे – आमदार मुळीक



डॉ. ब्रिजेश दीक्षित यांच्यासोबत मुळीक यांची बैठक.

पुणे, दि. १९ डिसेंबर, २०१७ : वडगाव शेरी विधानसभा मतदार संघाचे आमदार जगदीश मुळीक आणि महामेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांच्यात पुणे व पिंपरी – चिंचवड शहरात सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पाच्या कामासंबंधी नागपूर येथे बैठक झाली. मेट्रो प्रकल्पामुळे नागरिकांना फायदा होईल अशी अपेक्षा व्यक्त करीत मेट्रोच्या वनाझ ते रामवाडी मार्गिकेचे वाघोलीपर्यंत विस्तारीकरण करण्याची मागणी मुळीक यांनी केली. सध्या नागपूर येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनासाठी आलेल्या मुळीक यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन डॉ. दीक्षित यांच्याकडे सुपूर्द केले.

मेट्रो प्रकल्पामुळे वर्दळीच्या रस्त्यांवरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त करून मुळीक यांनी महामेट्रोच्या कामाचे कौतुक केले. पुणे मेट्रो प्रकल्पाला पाठिंबा देत त्यासाठी सहकार्य करण्याची भूमिकाही त्यांनी घेतली. याबरोबरच शिवाजीनगर ते रामवाडी मार्गिकेचे काम देखील लवकर सुरू करावे, असे मुळीक यांनी सांगितले. या मार्गिकेसंबंधीची निविदा प्रक्रिया येत्या तीन महिन्यात पूर्ण करून मेट्रोचे काम लवकरात लवकर सुरू करण्यात येईल, असे आश्वासन डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी दिले.

नागपूर मेट्रो प्रकल्पाचे काम गतीने सुरू असल्याबद्दल मुळीक यांनी या वेळी समाधान व्यक्त केले.विशेषत: वर्धा रस्त्यावरील मेट्रोचे काम आणि या विभागातील उड्डाणपुलाच्या वरून जाणा-या पुलावरील (डबलडेकर) मेट्रो मार्गाचा त्यांनी उल्लेख केला. मागील वर्षी डिसेंबरमध्ये मुळीक यांनी नागपूरला भेट दिली होती. या ठिकाणी वर्षभरात झालेल्या बदलामुळे आपण प्रभावित झालो असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.